संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-१
कोषागार 1/24 — नोंद
1 JAN 2021
000515
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३२०८

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,विस्तार दालन क्रमांक ६२५ मुंबई ४०००३२
Email ID desk13a.gad-mah

क्रमांक : भनिनि ११२०/ २२१ /प्र.क्र.६५/१३-अ,
दिनांक : ०१ जानेवारी,२०२१.

प्रति,

संचालक,
लेखा व कोषागारे संचालनालय,थाकरसी हाऊस,
३ रा मजला, शूरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई.

विषय : अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्त /मृत्यूनंतर अंतिम भविष्य निर्वाह निधी रक्कम व गट विमा योजना रक्कम देण्याबाबत.

संदर्भ : वित्त विभागाचे क्र.गवियो-२०२०/प्रक्र.७५/विमा प्रशासन, दि.८डिसेंबर,२०२० चे पत्र व सोबतचे आपले क्र.संलेको/कोषा/रालेअ-५/ नस्ती क्र.१/अधिसंख्य पदे/२०२०/२४८/३४०९.दि.४डिसेंबर,२०२० चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे आपले संदर्भाधीन पत्र वित्त विभागाकडून या कार्यासनास प्राप्त झाले आहे.

२ अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्त/मृत्यूनंतर अंतिम भविष्य निर्वाह निधीची रक्कम देय ठरतात,अशी संचालनालयाची धारणा आहे. सदर धारणा पक्की करण्याबाबत उपरोक्त पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

३ यासंदर्भात नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ हे सामान्य प्रशासन विभागाने विहित केले आहेत. सदर नियमातील नियम २१ (१) अन्वये जेव्हा वर्गणीदार नोकरी सोडून जाईल तेव्हा त्याच्या खाती निधीमध्ये जमा असलेली रक्कम त्याला देय होईल अशी तरतूद आहे.

वर्गणीदाराने स्वतः भरलेल्या रकमेचा समावेश भविष्य निर्वाह निधी रकमेमध्ये असतो. सदर रक्कम हे कर्मचाऱ्याचे वैयक्तिक योगदान आहे. यास्तव अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्त /मृत्यूनंतर अंतिम भविष्य निर्वाह निधी रक्कम देय ठरते, ही संचालनालयाची धारणा पक्की करण्यात येत आहे. रजा रोखीकरण व गट विमा योजनेबाबत वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

आपली,

(सं.प्र.खोपडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १) कक्ष अधिकारी (विमा प्रशासन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२) निवडनस्ती, कार्यासन १३-अ , सामान्य प्रशासन विभाग.

.google.com/mail/u/0/?tab=rm&ogbl#inbox/FMfcgxwKkRKchLBqPkbjJcTbkmVnFVCS?projector=1&messagePartId=0.1
OPPO A9 2020
2021/01/12 16:46
Scanned with Cam